चांदा ते बांदा योजनेंतर्गत सन २०१९-२० साठी मागणी क्र.ओ.१०, (४५१५०९०५) या लेखाशिर्षाखाली मंजूर योजनांसाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक:- चांबांयो-२०१९/प्र.क्र.८४/का.१४१८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १ ऑगस्ट, २०१९.

वाचा:-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि.२९.०६.२०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि.७.०७.२०१७.
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. चांबांयो-२०१९/प्र.क्र.८४/का.१४१८, दि.२०.०६.२०१९.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८.०७.२०१९.
५) जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र.जिप्रव्यक/का-१५/कास-१/चांबांयो/२०१९/२५,दि.१४.०५.२०१९.
६) जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांचे पत्र क्र.Plan-चांदा ते बांदा/ दि.११.०६.२०१९.

शासन निर्णय:-

नियोजन विभाग, शासन निर्णय दि.२९.०६.२०१६ अन्वये चंद्रपुर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होण्यासाठी सधन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये “चांदा ते बांदा”ही योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच नियोजन विभाग, शासन निर्णय दि.७.०७.२०१७ अन्वये “चांदा ते बांदा” ही योजना राबविण्यासाठी योजनेच्या सुधारीत कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आलेली आहे. “चांदा ते बांदा” कार्यक्रमांतर्गत मंजुर योजनांसाठी लागणा-या खर्चाकरीता निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२. जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांनी संदर्भाधीन क्र.५ व ६ येथील पत्रांनुसार चांदा ते बांदा कार्यक्रमाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र.ओ-१०, लेखाशिर्ष ४५१५०९०५ अंतर्गत उद्दीष्टनिहाय एकुण अनुक्रमे रु.६३५२.६३ लक्ष व रु.२०००.०० लक्ष इतक्या निधीची मागणी केलेली आहे. संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांना उपरोक्त लेखाशिर्षाखाली उद्दीष्टनिहाय अनुक्रमे रु.९१०.८५ लक्ष व रु.७७१.५४ लक्ष इतका निधी यापुर्वी वितरीत करण्यात आला आहे.

३. चांदा ते बांदा कार्यक्रमाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग यांनी संदर्भाधीन क्र.५ व ६च्या पत्रानुसार केलेली उद्दीष्टनिहाय मागणी विचारात घेऊन मागणी क्र.ओ-१०, लेखाशिर्ष “४५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,००, इतर विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, १०२, सामुहिक विकास, (०२), चांदा ते बांदा विशेष कार्यक्रम, (०२)(०१), चांदा ते बांदा योजने अंतर्गत विकास योजना राबविणे (४५१५०९०५)” याखाली (५३) मोठी बांधकामे या उद्दीष्टांतर्गत पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे “जिल्हाधिकारी, चंद्रपुर व सिंधुदुर्ग” यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उद्दीष्ट	वितरीत करावयाचा निधी (रु.लाखात)		
	चंद्रपुर	सिंधुदुर्ग	एकुण
१	२	३	४
५३- मोठी बांधकामे	६५४.६४	६५४.६४	१३०९.२८
एकुण	**६५४.६४**	**६५४.६४**	**१३०९.२८**

४. "जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग" यांनी सदरहू अनुदान "आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग" यांना वितरीत करावे. "आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, चंद्रपूर व सिंधुदूर्ग" यांनी मंजूर करण्यात आलेले अनुदान उद्दीष्ट निहाय व विहित मर्यादेत खर्च करावे. त्याचप्रमाणे मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता ध्यावी.

५. चांदा ते बांदा कार्यक्रमाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी या शासन निर्णयान्वये वाटप करण्यात येत असलेला निधी हा मासिक निधी विवरण पत्रानुसार (Cash Flow Statement) करण्यात येत आहे.

६. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१९-निधी वितरण याविषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि.८.०७.२०१९ मधील तरतूदी/निदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०८०११४५३११०२१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vanita Narayan
Jadhav

Digitally signed by Vanita Narayan Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f0e1884948542877a779b797fc357f1c34d84fe1aa3f9bdc30c060e0431223f, serialNumber=ad56893b2ddc6497ed23d778715c30a6ea094f5d1e0fb38a44ac5b9179a65d83, cn=Vanita Narayan Jadhav
Date: 2019.08.01 14:58:28 +05'30'

(वनिता ना. जाधव)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपुर.
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
३. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर / नवी मुंबई.
४. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
६. जिल्हा समन्वयक, चांदा ते बांदा, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर / सिंधुदुर्ग.
७. प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (अर्थ-१६), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती.